Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 291 – 296
DOI: 10.5281/zenodo.10125064

**Original Research Article**

# महात्मा गांधीजींची तत्वे आणि वर्तमान स्थिती

प्रा. डॉ. बालाजी मारूती गव्हाळे

सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होलकर महाविद्यालय राणीसावरगाव, ता. गंगाखेड, जि. परभणी ४३१५३६ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: drsbg28@yahoo.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

२ ऑक्टोबर १८६९ पोरबंदर येथे जन्मलेल्या एका असामान्य व्यक्तिमत्त्वाने केवळ भारतीय स्वातंत्र्यलढ्यात योगदान दिले नाही, तर आपल्या विचारसरणीने जगाला वेगळा आदर्श दिला. मोहनदास करमचंद गांधी म्हणजे बापूंच्या गांधीवादी विचारसरणीने जगभरातील अनेक सन्माननीय व्यक्ती प्रभावित झाल्या. गांधींजींचे विचार म्हणजे प्रेरणा, दृष्टी आणि गांधीजींच्या जीवनकार्याचे दर्शन घडते. महात्मा गांधीजींचे स्वातंत्र लढयात खुप मोठे योगदान आहे. भारतीय स्वातंत्राचा लढा गांधीजींच्या कार्याभोवती केंद्रीय झाला. सत्य आणि अहिंसा ही गांधी विचाराने जगाच्या इतिहासावर कायमचे चिन्ह कोरले. जरी अहिंसेचे तत्त्व गांधीजींनी स्वतः मांडले नसले तरी इतक्या मोठ्या राजकीय स्तरावर अहिंसेचा अवलंब करणारे ते पहिले व्यक्ती होते. हिंदू, बौद्ध, जैन, ज्यू धर्मात अनेक ठिकाणी अहिंसेच्या तत्त्वाचा उल्लेख आहे. माझे सत्याचे प्रयोगमध्ये गांधीजींनी त्यांचे अहिंसेचे तत्त्वज्ञान मांडले आहे.

## उद्दिष्टये

प्रस्तूत शोध निबंधाचे उद्दिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१. महात्मा गांधीजी यांचे सत्य व अहिंसेबाबतचे विचार स्पष्ट करणे.
२. गांधीजींच्या तत्त्वांचा समाजावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
३. गांधीजींच्या अहिंसा विचारसरणीचा अभ्यास करणे.

**गांधीजींची तत्त्वे**

**१. सत्य (Truth)**

सत्य म्हणजे काय ? गांधीजी म्हणतात सत् - सत्य – म्हणजे आहे. असत् - असत्य – म्हणजे 'नाही.' 'नाही' त्याचा जय कसा होणार ? 'आहे' त्याचा नाश कोण करू शकणार ? पृथ्वी ही सत्याच्या बळावर टिकली आहे. सत्य म्हणजेच 'खरे अस्तित्व' व हे एकच ईश्वराचे खरे स्वरूप आहे. 'Truth is God' अंतिम सत्यात संपूर्ण ज्ञान (चित्) आणि अक्षय आनंद याचा अंतर्भाव होतो. म्हणूनच ईश्वराचे वर्णन 'सत्-चित्-आनंद' असे करण्यात येते. सत्य हा गांधींच्या जीवनातील व तत्त्वज्ञानातील ध्रुवतारा होय.

मानवी जीवनात व्यक्तीच्या डोळयासमोर सापेक्ष सत्य (Relative Truth) असते. मनुष्य त्याच्याच मागे लागलेला असतो. त्यास अंतिम किंवा निरपेक्ष सत्याकडे (Absolute Truth) जायचे असते. त्यासाठी अंतिम ध्यास घ्यावा लागतो, सतत आग्रह धरावा लागतो. भौतिक जीवनातील सापेक्ष सत्यापासून अंतिम किंवा निरपेक्ष सत्याप्रत जाण्याचा आग्रह धरणे म्हणजेच 'सत्याग्रह' होय. ही एक नैतिक व आध्यात्मिक प्रक्रिया असून तिने व्यक्तीचा नैतिक विकास होऊन ईश्वराचा साक्षात्कार होऊ शकतो. भाषण, कृती व विचार या तिन्हीत सत्य आणावयास पाहिजे. दैनंदिन जीवनात सत्याची काही उदाहरणे त्यांनी दिली आहेत. न्याय्य व योग सामाजिक संबंध आणि स्वतःच्या तसेच इतर देशांना स्वातंत्र्य हे सत्य होय. पारतंत्र्य असत्य होय. चुका स्वीकारणे व दुरुस्त करणे, स्वतःवर नियंत्रण ठेवणे, कटुता कमी करणे, अहिंसा इत्यादी सर्व सत्याचेच प्रकार होत. या उलट आचरण म्हणजे असत्य होय.

**२. अहिंसा (Non-Violence)**

अहिंसा म्हणजे आत्म्याचे सामर्थ्य,' असे गांधीजी सांगतात, अहिंसेचे रोपटे हळूहळू वाढीस लागते. त्याची वाढ दिसत नसली तरी खात्रीपूर्वक होत असते. अहिंसा हे साधन असून सत्य हे साध्य आहे. अहिंसा हा मानवी हृदयाचा एक गुणविशेष आहे.

अहिंसेचे पहिले पाऊल म्हणजे आपल्या दैनंदिन जीवनात परस्परांविषयी सहिष्णुता, सत्यवादित्व, ममत्व आणि नम्रता यांचा व्यवहार करणे होय. अहिंसा म्हणजे केवळ हत्या न करणे, एवढेच नव्हे, त्याशिवाय मानसिक, शाब्दिक किंवा कृतीद्वारा कोणालाही इजा किंवा दुखापत न करणे, दुष्ट इच्छा न करणे, कठोर शब्द किंवा अपशब्द न बोलणे, क्रोध येऊ न देणे, क्रौर्य न करणे, हालचाल न करणे, भुकेने तळमळत न ठेवणे, गरिबांचा किंवा कनिष्ठांचा मानभंग न करणे, शत्रूबद्दलही सूडभावना न बाळगणे म्हणजे अहिंसा होय. हिंसेच्या प्रतिकारासाठीसुद्धा अहिंसा वापरण्यात यावयास पाहिजे, तेव्हाच तिची कसोटी लागते. सामाजिक व राजकीय किंवा आध्यात्मिक क्षेत्रात मान्यता पावलेली काही थोर माणसेही अनेकदा चिडतात, संतापतात, अहंमन्यतेने गर्वोक्ती करतात, भूलथापा देतात व स्वतःच्या मोठेपणाचा उपयोग करून सामान्यांना कटू, कठोर शब्द बोलतात असे आज आपणांस दिसते.

हिंसा करण्याची पात्रता असूनही अहिंसा हे शूराचे लक्षण आहे, भूषण आहे. ज्याच्या आत्मिक बलाचा तो अहिंसेला चिकटून राहतो. म्हणूनच अहिंसेत आघात करण्याचे सामर्थ्य गृहीत धरले आहे. एखाद्याच्या सूड घेण्याच्या इच्छेवर त्याने स्वतःच स्वेच्छेने घातलेले नियंत्रण म्हणजे अहिंसा. अहिंसा म्हणजे भित्रेपणाचा आडपडदा नव्हे. नैतिक

मनोसामर्थ्यातून केलेली अहिंसा ही सर्वश्रेष्ठ असून हे जमत नसल्यास मेलेली बरी. तिला गांधीजी दुसरा क्रमाक देतात. ज्याला आपला संताप येत नाही तो हिंसा करतो, निदान तो आपल्या भावनांशी असतो. सत्य त्यात असते. पण भ्याडपणात अहिंसाही नाही व सत्यही नाही, कारण मनातून हिंसा करावयाची असते. म्हणून भित्रेपणातून जन्माला आलेल्या तथाकथित अहिंसेपेक्षा हिंसा बरी, असे ते म्हणतात.

**अहिंसेची विचारसरणी**

गांधीजी आपल्या अहिंसेच्या तत्वाबद्दल प्रमाणिक होते. हल्ली गांधीजींचे नाव घेवून चालणारी माणसे त्यांच्या विचारांबरोबर प्रामाणिक नसतात. पण गांधीजी आपल्या पुर्ण अहिंसेच्या तत्वाशी प्रामाणिक होते. त्यासाठी इतर ऐतिहासिक नायकांच्या तत्वांना विरोध करणे गांधीजींनी टाळले नाही. गांधीजींच्या मते अहिंसा हा मनुष्याचा स्थायीभाव असल्याने त्याने प्रश्न सुटतात, तर हिंसेने प्रश्न अधिक बिकट होत रहातात. त्याचबरोबर अहिंसेने मनुष्यात बदल होतो, मनुष्याचा आजार बरा होतो व तो अन्याय करणे सोडतो. अहिंसा मनुष्यामनुष्यामधले परस्परप्रेमाचे नाते पक्के करते. त्यामुळे ब्रिटीशांविरुध्द लढतानाही गांधीजींचे ब्रिटीश जनतेवर तितकेच प्रेम होते जितके भारतीय जनतेवर होते. या दृष्टीने विचार केल्यास गांधीजींची अहिंसेची विचारसरणी संपुर्ण जगासाठी आदर्श ठरते. सध्याचे असणारे अनेक जागतिक बिकट प्रश्न परस्पर सहकार्याने व परस्पर प्रेमाने सुटु शकतील असे वाटते. शिवाय गांधीजींचा अहिंसात्मकरीत्या सत्याग्रह करण्याचा मार्ग त्या काळातील परीस्थितीनुसार भारतीय जनतेस रुचणारा होता. त्यामुळे गांधीजींनी स्वातंत्र्याची चळवळ सामान्य जनतेपर्यंत नेली व त्या चळवळीला उदंड प्रतिसाद मिळवुन दिला.

सशस्त्र लढ्याचा मार्ग आपल्या भारतीय जनतेला रुचणारा नव्हता असे आपण म्हणु शकतो. कारण त्याला आवश्यक असणारी त्यागाची भावना त्या काळातील सर्वसामान्य भारतीय जनतेत नव्हती. सावरकर म्हणतात की मातृ भुमिसाठीची लढाई म्हणजे सतीचे वाण आहे. पण गांधीजींचा मार्ग सोपा होता. कायद्याला विरोध करत दोन चार लाठ्या खाणं आणि जेलमध्ये जाणं त्या काळातील सामान्य जनतेला जास्त सोप होतं. गांधीजींच्या अहिंसेबद्दल अजुन एक महत्वाची गोष्ट अशी आहे की, निर्बल आणि हतबल माणसाला त्या पध्दतीने अन्यायाचा प्रतिकार करण्याशिवाय दुसरा कुठला पर्यायच नाही. त्याचमुळे भगत सिंग्, स्वातंत्र्यवीर सावरकर व इतर क्रांतिकारकांनीही आपल्या तुरुंगवासात होणाऱ्या अन्यायाविरुध्द अहिंसात्मक सत्याग्रहाचा व उपोषणाच्या मार्गाचा अवलंब केलेला दिसतो. म्हणजे गांधीजींच्या मार्गाचे जे कट्टर विरोधक होते ते सुध्दा दुसरा कुठला उपाय नसल्यावर त्याच गांधीजींच्या मार्गाचा अवलंब करतात.

**३.** शाकाहार

लहानपणी अनेकदा गांधीजींनी मांस भक्षण केले होते. ते मुख्यत्वेकरून त्यांच्या कुतुहलामुळे तसेच त्यांचा मित्र शेख मेहताब याच्या सांगण्यावरून होते. शाकाहाराची कल्पना हिंदू तसेच जैन प्रथांमध्ये खोलवर रुजली आहे. तसेच गांधीजींची जन्मभूमी गुजरातमध्ये बहुतांश हिंदू आणि सर्व जैन शाकाहारी होते आणि गांधीजींचे कुटुंबही याला अपवाद नव्हते. लंडनला शिकायला जाण्याआधी गांधीजींनी त्यांची आई पुतळीबाई आणि काका बेचारजी स्वामी यांना वचन दिले होते की, ते मांस, बाई व बाटली (दारू) यांच्यापासून दूर राहतील. पुढे गांधीजी कडक शाकाहारी बनले.

**गांधीजींचे विचार**

ज्या कामातून आपण चांगला माणूस बनू शकतो, अशा कामावर गांधीजी विश्वास ठेवत. गांधीजी हे या शतकातील महान नेते आहेत. सत्याला बोलण्याची गरज पडत नाही, ते आपल्या कृतीतून दाखवत होते. सत्याची कास धरल्यास मानवाचा नक्की विकास होईल. केवळ जीवहिंसा न करणे याबरोबरच आपल्या धर्माइतकेच इतर धर्मालाही महत्त्व देणे म्हणजे अहिंसा होय. म्हणून आपण सहिष्णू असले पाहिजे. 'आपण नव्या युगाची आशा आहोत. जे ज्ञान आपल्यापर्यंत आले, त्याचा आपल्या आयुष्याशी संबंध जोडला पाहिजे. गांधीजींनी नेहमीच आतल्या आवाजाला महत्त्व दिले. आपणही आपला आतला आवाज ओळखून त्याप्रमाणे कृती केले पाहिजे. दुसऱ्याचेही म्हणणे ऐकून घेण्याची सवय लावली पाहिजे. गांधीजींनी देशात राष्ट्रीय एकात्मता साधण्याचा प्रयत्न केला आणि हेच खरे गांधी विचाराचे सौंदर्य आहे. अहिंसा हा मनुष्याचा स्थायीभाव आहे. जे देश आणि समाज अहिंसेच्या मार्गाचा अवलंब करतात त्यांनी आत्मसन्मान सोडुन बाकी सगळ्याचा त्याग करायला शिकायला हवे. त्यामुळेच अहिंसा हे कुठल्या भित्र्या माणसाचे नाही तर उलट धाडसी माणसाचे लक्षण आहे असे गांधीजी म्हणतात.

शिवाय गांधीजींची अहिंसेची शिकवणुक सर्वांनाच पाळणे शक्य असते. त्यासाठी शरीरयष्टी, हत्यारे, साधनसामग्री यांची कशाचीच आवश्यकता नसते. त्यामूळे गांधीजींची ही अहिंसात्मक चळवळ भारतातील सामान्य जनतेत प्रचंड लोकप्रिय झाली. त्याचबरोबर गांधीजींनी सत्याला पण खुप महत्व दिले. तथागत बुध्दांच्या सत्य व अहिंसेची प्रेरणा घेवुन भारताला स्वातंत्र मिळवुन दिले. तथागत भगवान बुध्दानंतर सत्य व अहिंसेचा एवढा मोठा पुजारी झाला नाही. गांधीजी म्हणतात की, इतर सर्व गोष्टींपेक्षा माझे प्रेम अहिंसेच्या तत्वावर आहे. जर अहिंसेच्या तत्वाइतके कशावर माझे प्रेम असेल तर ते आहे सत्यावर. गांधीजी अहिंसा आणि सत्यामध्ये फ़रक बघत नसत. तर अहिंसा हे साधन आहे व सत्य हे साध्य आहे. त्यामुळे जर आपण साधनांची काळजी घेतली तर आपण साध्यापर्यंत पोहोचणारच यात काही शंका नाही असे गांधीजींचे मत होते.

**गांधीजींवरील पुस्तके**

- Indian Home Rule (हिंद स्वराज्य)
- गांधीजींची संक्षिप्त आत्मकथा
- गांधीजीचे जीवन त्यांच्याच शब्दांत
- गांधी विचार दर्शन : अहिंसाविचार
- गांधी विचार दर्शन : राजकारण
- गांधी विचार दर्षन : सत्याग्रह प्रयोग
- गांधी विचार दर्शन : सत्याग्रह विचार
- गांधी विचार दर्शन : सत्याग्रहाची जन्मकथा
- गांधी विचार दर्शन : हरिजन
- नैतिक धर्म
- भगवद्गीता : गांधीजींच्या चिंतनातून (महात्मा गांधी यांनी जनसामान्यांसाठी भगवद्गीतेचे केलेले नेमके विवेचन; मराठी अनुवाद : भगवान दातार)

- माझ्या स्वप्नांचा भारत

**निष्कर्ष**

१. जगात हिंसेचा प्रभाव असताना सत्याग्रह, अहिंसा व शांतता ही शस्त्रे घेऊन बलाढ्य ब्रिटिश साम्राज्याला आव्हान देणाऱ्या गांधीजींच्या मागे लाखो लोक तयार झाले.
२. जगाच्या इतिहासात एकमेव असा भारताचा स्वातंत्र्यलढा हा मानवव्यापी प्रेमाच्या आधारावर लढलेला निःशस्त्र लढा होय.
३. शत्रूच्या हृदयातसुद्धा नैतिक बीज असते. त्याच्या हृदयावरील मोहाचे बंधन नष्ट करून सद्सदविवेकबुद्धी जागृत करणे व शत्रूचे हृदयपरिवर्तन करून आपापसातील वैरभाव मिटवता येतो. यातूनच मानवतावादाचा धर्म गांधीजींनी जोपासला व जगाला अहिंसेचा व शांततेचा मंत्र दिला.
४. आज रक्ताळलेल्या विश्वाला गांधीजींच्या तत्त्वज्ञानाशिवाय पर्याय नाही.
५. अहिंसेचे या पातळीपर्यंत पालन करण्यासाठी प्रचंड श्रद्धा आणि धैर्य आवश्यक आहे, आणि प्रत्येकाजवळच ते असणे शक्य नाही. जर अहिंसा भित्रेपणाला झाकण्यासाठी वापरण्यात येत असेल तर प्रत्येकाने अहिंसेचे पालन करणे आवश्यक नाही.
६. गांधीजींनी आपले आयुष्य सत्याच्या शोधासाठी अर्पण केले होते. त्यांचे आत्मचरित्र माझे सत्याचे प्रयोग या नावाखाली प्रसिद्ध आहे. गांधीजींनी म्हटले आहे की, सर्वांत महत्त्वाची लढाई ही स्वतःच्या वाईट प्रवृत्ती, भय आणि असुरक्षितता यांच्यावर मात करणे ही होय. "परमेश्वर सत्य आहे." असे त्यांचे मत होते. पुढे त्यांनी ते, "सत्य (हेच) परमेश्वर आहे." असे बदलले. जरी अहिंसेचे तत्त्व गांधीजींनी स्वतः मांडले नसले तरी इतक्या मोठ्या राजकीय स्तरावर अहिंसेचा अवलंब करणारे ते पहिले व्यक्ती होते. हिंदू, बौद्ध, जैन, ज्यू धर्मात अनेक ठिकाणी अहिंसेच्या तत्त्वाचा उल्लेख आहे. "माझे सत्याचे प्रयोग" मध्ये गांधीजींनी त्यांचे अहिंसेचे तत्त्वज्ञान मांडले आहे.

**संदर्भ सुची**


१. **सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा**, महात्मा गांधीजी
२. घानेकर वि. वि., **महात्मा गांधीजी व एकविसावे शतक**
३. यंग इंडिया, २० आक्टोंबर १९२७
४. विभूते भालबा, संपा, **महात्मा गांधी विचार प्रौढ आणी निरंतर शीक्षण व विस्तार कार्य विभाग**, शीवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
५. बोस निर्मलकुमार, **गांधी कार्य व विचारप्रणाली**, महाराष्ट राज्य साहित्य आणी संसद मंडळ, मुंबई
६. जाधव श्रीराम, **गांधीजी आणी सामाजिक समता**, महात्मा गांधी अध्ययन केंद्र, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद
७. आण्णासाहेब गरूड, **महाराष्टातील समाजसुधारणेचा इतिहास**, कैलास प्रकाशन, औरंगाबाद
८. साहेबराव गाठाळ, **आधुनिक भारतीय विचारवंत**, कैलास प्रकाशन, औरंगाबाद

९. सुमित सरकार, **आधुनिक भारत का इतिहास**, राजकमल प्रकाशन दिल्ली

१०. जयसिंग पवार, **आधुनिक भारत**, अरूंधती प्रकाशन, कोल्हापुर

११. जावडेकर, श् द. **आधुनिक भारत**, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे